**वाचले-१)** महाराष्ट्र शासन, सार्वजनीक आरोग्य विभाग, नविन मंत्रालय, मुंबई -४००० ००१ यांचे कडील क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च २०२०

२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग,यांचे कडील आदेश क्र.DMU/2020/CR.92/ DISM-1/दि.२९ जून २०२०

३) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग,यांचे कडील आदेशक्र.डीएमयू/२०२०/प्र.क्र.९२/डी आयएसएम-१ दि.२९ जुलै २०२०

४)आदेश क्र.वैद्य/०९/कावि /४१५२/२०२०दि.०४/०८/२०२०

५)मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचेकडील दि.१६ /१०/२०२० चा मान्य प्रस्ताव

---

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**क्रीडा विभाग**
**क्र. क्रीडा/ ०६ /कावि/३५८ /२०२०**
**दि. १६ /१०/२०२०**

**विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील मैदानावर मैदानी शारीरिक कसरती (जिम्न्यॅस्टिक),टेनिस व मल्लखांब यांसारख्या बिगर सांघिक मैदानी क्रीडा प्रकार सुरु करणेस परवानगी देणेबाबत**

**आदेश ,**

महाराष्ट्र शासन, सार्वजनीक आरोग्य विभाग, नविन मंत्रालय, मुंबई -४००० ००१ यांचे कडील क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च २०२० या आदेशान्वये,महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, नविन मंत्रालय, मुंबई -४००० ००१ यांचे कडील क्र.करोना २०२०/ प्र.क्र.५८ /आरोग्य ५ दि.१४ मार्च २०२० चे आदेशान्वये, “राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्या बाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहे.

करोना विषाणूचा प्रदूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून आपल्या कार्यक्षेत्रातील खालील अस्थापना दि.१३ मार्च २०२० पर्यंत साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतूदी नुसार सक्षम प्रधिका-याच्या मान्यतेने बंद ठेवण्याबाबत या द्वारे सुचित करण्यात आले आहे.

१. चित्रपटगृहे, २. तरणतलाव, ३. व्यायामशाळा, ४. नाट्यगृहे

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणारे सर्व जलतरण तलाव, सर्व मैदाने व सर्व लॉनटेनिस कोर्ट (चालविण्यास दिलेले सुध्दा) तसेच सर्व बॅडमिंटन कोर्ट व व्यायामशाळा या सर्व क्रीडा सुविधा दि.१६/३/२०२० पासून नागरिकांसाठी बंद ठेवण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग,यांचे कडील आदेश क्र.DMU/2020/CR.92/DISM-1/दि.२९ जून २०२० मधील अ.क्र. ९ ब) मध्ये क्रीडा संकुले,स्टेडीयम यांचे बाह्य भाग व खुली सार्वजनिक ठिकाणे,महापालिकेची मैदाने व उद्याने, संस्था/सोसायटीची मैदाने,उद्यान नागरिकां साठी खुली राहतील.तथापि आशा ठिकाणी फक्त वैयक्तिक रित्या करावयाचे व्यायाम प्रकार, एकट्याने खेळावयाचे खेळ उदा.सायकल,जॉगिंग धावणे,चालणे ,योगासने दोरीवरच्या उड्या इत्यादींना मुभा राहील असे नमूद आहे .

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मैदानावर योगा,चालणे,धावणे व दोरीवरील उड्या या खेळासाठी नागरिकांना परवानगी देण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग,यांचे कडील आदेश क्र.डीएमयू/२०२०/प्र.क्र.92/डी आयएसएम-१ दि.२९ जुलै २०२० मधील जोड पत्र-दोन ,एकोणीस मध्ये** -गोल्फ कोर्स,मैदानावरील नेमबाजी परिक्षेत्र (फायरिंग रेंज),मैदानी शारीरिक कसरती (जिम्न्यॅस्टिक),टेनिस ,मैदानावरील बॅडमिंटनव मल्लखांब यांसारख्या बिगर सांघिक मैदानी क्रीडा प्रकारांना ,सामाजिक आंतर व स्वच्छता/निर्जुन्तुकिकरणाच्या उपाय योजनांसह दि.५ ऑगष्ट,२०२० पासून परवानगी असेल.जलतरण तलाव सुरु करण्यास परवानगी असणार नाही.असे नमूद आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील मैदानावर मैदानी शारीरिक कसरती (जिम्न्यॅस्टिक),टेनिस व मल्लखांब यांसारख्या बिगर सांघिक मैदानी क्रीडा प्रकारांना ,सामाजिक आंतर व स्वच्छता/निर्जुन्तुकिकरणाच्या उपाय योजनांसह सुरु करणेस परवानगी देणे आवश्यक आहे .

सबब ,मी अतिरिक्त आयुक्त(२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी ४११०१८ या आदेशान्वये , महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग,यांचे कडील आदेश क्र.डीएमयू/२०२०/प्र.क्र.९२/डी आयएसएम-१ दि.२९ जुलै २०२० चे अधीन राहून पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील मैदानावर, **मैदानी शारीरिक कसरती (जिम्न्यॅस्टिक),टेनिस व मल्लखांब यांसारख्या बिगर सांघिक मैदानी क्रीडा प्रकार** ,सामाजिक आंतर व स्वच्छता/निर्जुन्तुकिकरणाच्या उपाय योजनांसह सुरु करणेस मान्यता देत आहे.

सही/-
(अजित पवार)
अतिरिक्त आयुक्त(२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति-१)संबंधित क्रीडा पर्यवेक्षक
अ /ब /क /ड /इ /फ /ग /ह क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

२/-सर्व संबंधित क्रीडा पर्यवेक्षक यांनी आपले नियंत्रणाखालील आदेश नमूद केलेप्रमाणे क्रीडा सुविधा आदेशाचे तारखेपासून सुरु करण्याची कार्यवाही करावी व तसा अहवाल क्रीडा विभागास सादर करावा .

सही/-
(संदीप खोत )
उप आयुक्त (क्रीडा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

**वाचले-१)** महाराष्ट्र शासन, सार्वजनीक आरोग्य विभाग, नविन मंत्रालय, मुंबई -४००० ००१
यांचे कडील क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च २०२०

२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग,यांचे कडील आदेश क्र.DMU/2020/CR.92/DISM-1/दि.२९ जून २०२०

३)आदेश क्र.वैद्य/०९/कावि /४१५२/२०२०दि.०४/०८/२०२०

४) मा.आयुक्त यांचेकडील दि. /१०/२०२० चा मान्य प्रस्ताव

---

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**क्रीडा विभाग**
**क्र. क्रीडा/ ०६ /कावि/ ३६४/२०२०**
**दि. २७/१०/२०२०**

**विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील मैदानावर बॅडमिटन, स्कॉश कोर्ट,क्रिकेट, खो खो, स्केटिंग वैयक्तिक मैदानी खेळ सुरु करणेस परवानगी देणेबाबत.**

**आदेश ,**

महाराष्ट्र शासन, सार्वजनीक आरोग्य विभाग, नविन मंत्रालय, मुंबई -४००० ००१ यांचे कडील क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च २०२० या आदेशान्वये,महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, नविन मंत्रालय, मुंबई -४००० ००१ यांचे कडील क्र.करोना २०२०/ प्र.क्र.५८ /आरोग्य ५ दि.१४ मार्च २०२० चे आदेशान्वये, "राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्या बाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहे.

करोना विषाणूचा प्रदूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून आपल्या कार्यक्षेत्रातील खालील अस्थापना दि.१३ मार्च २०२० पर्यंत साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतूदी नुसार सक्षम प्रधिका-याच्या मान्यतेने बंद ठेवण्याबाबत या द्वारे सुचित करण्यात आले आहे.

१. चित्रपटगृहे २. तरणतलाव, ३. व्यायामशाळा, ४. नाट्यगृहे

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणारे सर्व जलतरण तलाव, सर्व मैदाने व सर्व लॉनटेनिस कोर्ट (चालविण्यास दिलेले सुध्दा) तसेच सर्व बॅडमिंटन कोर्ट व व्यायामशाळा या सर्व क्रीडा सुविधा दि.१६/३/२०२० पासून नागरिकांसाठी बंद ठेवण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग,यांचे कडील आदेश क्र.DMU/2020/CR.92/DISM-1/दि.२९ जून २०२० मधील अ.क्र. ९ ब) मध्ये क्रीडा संकुले,स्टेडीयम यांचे बाह्य भाग व खुली सार्वजनिक ठिकाणे,महापालिकेची मैदाने व उद्याने, संस्था/सोसायटीची मैदाने,उद्यान नागरिकां साठी खुली राहतील.तथापि आशा ठिकाणी फक्त वैयक्तिक रित्या करावयाचे व्यायाम प्रकार, एकट्याने खेळावयाचे खेळ उदा.सायकल,जॉगिंग धावणे,चालणे ,योगासने दोरीवरच्या उड्या इत्यादींना मुभा राहील असे नमूद आहे .

सांघिक क्रीडा प्रकार या खेळाला महाराष्ट्र शासन परवानगी दिलेली नाही तरी पुणे महानगरपालिका कडील आदेशास अनुसरून पिंपरी चिंचवड महानगरपालिका देखील **बॅडमिटन,**

**स्कॉश कोर्ट, क्रिकेट, खो खो, स्केटिंग व वैयक्तिक खेळ इत्यादी क्रीडा प्रकारास** सुरू करणे कामी खालील प्रमाणे अटी शर्ती राहतील.

१) सामाजिक आंतर व स्वच्छता/निर्जुन्तुकिकरणाच्या उपाय योजनांसह व वय वर्ष १० वर्षाच्या आतील मुलांना तसेच ६५ वर्षावरील व्यक्तीना प्रवेश देता येणार नाही.

२) खेळासाठी वापरण्यात येणा-या क्रीडा साहित्याचे वापरापुर्वी व वापरानंतर निर्जतुकीकरण करण्यात यावे.

३) मैदानावर / इनडोअरहॉल येथे वारंवार निर्जतुकीकरण करण्यात यावे .

४) सोशल डिस्टन्सिंगच्या नियमाचे पालन करणे आवश्यक राहील .

५) सदर गर्दी टाळण्यासाठी व सोशल डिस्टन्सिंगच्या नियमांचे पालन करण्यासाठी सरावाकरिता आवश्यक तेवढ्याच / मर्यादित खेळाडूंना प्रवेश देण्यात यावा व सर्वाना मास्कचा वापर करणे बंधनकारक राहील.

६) प्रत्येक खेळाडूनी सॅनिटायझर वापर करणे व स्वखर्चाने आणने बंधनकारक राहील.

७) सर्व प्रकाराच्या क्रीडा स्पर्धा / उपक्रम / संमेलने घेण्यास बंदी राहील.

८) फक्त सरावाकरिता परवानगी देण्यात येत आहे.

९) कोवीड - १९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाव्दारे निर्गमित करणेत आलेल्या आदेशांचे उल्लघंन करणारा व्यक्ती, आपती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतीय दंड सहितेचे कलम १८८ अन्वये दंडनिय अपराध केला असे समजून कारवाईस पात्र राहील.

१०) स्वतःच्या जबाबदारीवरसदर खेळ प्रकार सुरू करण्यास मान्याता घेणेबाबत सोबतच्या प्रस्तानुसार मा .आयुक्त यांच्या मान्यतेने परवानगी कामी आदेश होणेस विनंती आहे .

वरील सांघिक मैदानी क्रीडा प्रकारांना ,सामाजिक आंतर व स्वच्छता/निर्जुन्तुकिकरणाच्या उपाय योजनांसह सुरु करणेस परवानगी देणे आवश्यक आहे .

सबब ,मी आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी ४११०१८ या आदेशान्वये अटी शर्ती अधीन राहून पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील मैदानावर **बॅडमिटन, स्कॉश कोर्ट, क्रिकेट, खो खो, स्केटिंग व वैयक्तिक खेळ इत्यादी क्रीडा प्रकारास**, सामाजिक आंतर व स्वच्छता/निर्जुन्तुकिकरणाच्या उपाय योजनांसह सुरु करणेस मान्यता देत आहे.

सही/-
(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति-१)संबंधित क्रीडा पर्यवेक्षक

अ /ब /क /ड /इ /फ /ग /ह क्षेत्रीय कार्यालय,पिंपरी चिंचवड महानगरपालिका

२/-सर्व संबंधित क्रीडा पर्यवेक्षक यांनी आपले नियंत्रणाखालील आदेश नमूद केलेप्रमाणे क्रीडा सुविधा आदेशाचे तारखेपासून सुरु करण्याची कार्यवाही करावी व तसा अहवाल क्रीडा विभागास सादर करावा .

सही/-
(संदीप खोत )
उप आयुक्त (क्रीडा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८